
## सोपेकॉम, मकाम आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था आयोजित एकदिवसीय चर्चासत्र

# ‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’

### दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ ‘शेतकरी सदन’, पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला

‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’ हे एक दिवसीय चर्चासत्र सोपेकॉम (पुणे), महिला किसान अधिकार मंच (मकाम), आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था ह्यांनी अकोल्यामधील पंजाबराव कृषी विद्यापीठातील ‘शेतकरी सदन’ इथे दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित केले होते. चर्चासत्रासाठी सुमारे १२० शेतकरी महिला, सरकारी अधिकारी तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



चर्चासत्राच्या उद्घाटनाला पोलीस अधीक्षक मा श्री बच्चन सिंह हे उपस्थित होते. तसेच ह्या सत्रासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव मा न्या. श्री योगेश पैठणकर, आणि जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री गिरीश पुसदकर हे देखील उपस्थित होते. मान्यवरांनी रोपाला पाणी घालून आणि सोपेकॉमने केलेल्या अभ्यासातील अकोल्या जिल्हाच्या अहवालाचे प्रकाशन करून चर्चासत्राचे उद्घाटन केले. उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक सोपेकॉमच्या सीमा कुलकर्णी यांनी केले व पाहुण्यांचे स्वागत मकाम च्या अकोला जिल्ह्याच्या प्रतिनिधी व प्रकृती संस्थेच्या सदस्य शालिनी वानखडे यांनी केले.

मा. न्या. योगेश पैठणकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला) यांनी मोफत कायदेशीर मदत कशी मिळवायची ह्याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी आश्वासन दिले की ते शेतकरी महिलांच्या संदर्भातील केसेस विशेष लक्ष देऊन हाताळतील आणि महिलांना न्याय मिळेल ह्या दृष्टीने कार्य करतील. सत्राचे दुसरे वक्ते मा. गिरीष पुसदकर (जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, अकोला) यांनी जिल्हा महिला बाल विकास विभागाचे कार्य आणि त्या अंतर्गत असलेल्या यंत्रणे सोबत (संरक्षण अधिकारी, भरोसा सेल, विधी अधिकारी, परिवीक्षा अधिकारी, समुपदेशन आणि इतर) मिळून ते कसे कार्य करतात याबद्दल स्पष्टता दिली. शेतकरी महिलांना उद्देशून बोलताना ते म्हणाले की त्यांना जर कोणत्याही हिंसेचा सामना करावा लागत असेल तर त्यांनी गावपातळीवरील, तालुकापातळीवरील यंत्रणेपर्यंत न घाबरता पोहोचावे.



अकोला जिल्ह्याचा अहवालातील निष्कर्ष लक्षात घेत, हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांपैकी केवळ १२ महिलांनी पोलीस स्टेशन मध्ये जाऊन मदत मागितली ह्याकडे लक्ष वेधून मा. श्री बच्चन सिंह त्याबद्दल खंत व्यक्त केली. महिलांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण होणे गरजेचे आहे असे मत त्यांनी नोंदवले. त्याचबरोबर त्यांनी, पोलिसांच्या विविध हेल्पलाईन जसे, ११२, १९१ याबद्दल महिलांना माहिती दिली. तसेच, भरोसा सेल व इतर यंत्रणांबद्दल सुद्धा सांगितले. महिला सुरक्षेच्या दृष्टीने दामिनी पथक संदर्भात माहिती दिली. विधी प्राधिकरणाचे सचिवांना उद्देशून ते म्हणालेत की यंत्रणेच्या प्रत्येक घटकांना (पोलीस पाटील, समुपदेशक, संरक्षण अधिकारी,

अंगणवाडी-सेविका, आशा वर्कर) विभागामार्फत होत असलेल्या सभांमध्ये सामील करावे ज्यामुळे यंत्रणा ही सक्रियपणे कार्यरत असेल. आणि पुन्हा एकदा त्यांनी महिलांना प्रोत्साहन देत सत्राचा समारोप केला. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या विशेष कक्षाच्या विदर्भ समन्वयक प्रतिभा गजभीये यांनी विशेष कक्षामार्फत निवेदन केले आणि मान्यवरांचे आभार मानले.



**सत्र दुसरे : महिलांवर होणारा हिंसाचार -सध्या जिल्ह्यात काय परिस्थिती दिसते आहे?**

सोपेकॉम आणि मकाम ह्यांनी 'शेती मधील अरिष्ट आणि महिलांवर होणारा हिंसाचार' ह्या विषयावर केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी त्यांनी केली. त्यांनी त्यांच्या मांडणीमध्ये, मुर्तीजापूर आणि अकोला ह्या दोन तालुक्यामधील ५५८ महिलांसोबत करण्यात आलेल्या अभ्यासातील महत्वाचे मुद्दे समोर ठेवले. ह्या अभ्यासातून शेती आणि शेतमजुरी करणाऱ्या महिलांना येणाऱ्या विविध अडचणी समोर आल्या. अभ्यास केलेल्या बहुतेक सर्व महिला ह्या भूमिहीन किंवा सीमांत आणि छोट्या शेतकरी होत्या. ८५% महिला उपजीविकेसाठी मजुरीवर अवलंबून होत्या. पिकाची एकसुरी पद्धत, हवामान बदलामुळे शेतीवर होणारे परिणाम, कामाची अनुपलब्धता, बिनमोलाच्या कामाचे वाढलेले ओझे, वाढता कर्जबाजारीपणा, अन्न आणि पोषण असुरक्षितता, आरोग्यावर होणारे परिणाम ह्यासंबंधी त्यांनी चर्चा केली. त्याचबरोबर अभ्यासातून एकट्या महिला, संसाधनहीन जाती-जमातींमधील महिला ह्यांना येणारे हिंसाचाराचे अनुभव अधिकच गंभीर असतात हे दिसून येत असल्याचे स्पष्ट केले. अभ्यासातील ६०% महिलांनी त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सांगितले ह्याकडे त्यांनी सर्वांचे विशेष लक्ष वेधले.



त्यानंतर महिला व मुलांसाठी विशेष कक्षाच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडे महिला ज्या केसेस घेऊन येतात त्या आधारे जिल्ह्यातील महिलांचे काय अनुभव आहेत त्याबद्दल मांडणी केली. शारीरिक, आर्थिक, मानसिक आणि लैंगिक हिंसाचाराच्या व्याख्यांच्या आधारे त्यांनी हाताळलेल्या केसेस चे वर्गीकरण करून आकडेवारी प्रस्तुत केली. महिलांना उद्देशून सांगितले की अत्याचार सहन करण्यापेक्षा यंत्रणेची मदत घेत स्वतःची सुरक्षा करावी.

अभ्यासाच्या मांडणीवर चर्चा करण्यासाठी चर्चक म्हणून अकोला जिल्ह्याच्या जिल्हा संरक्षण अधिकारी मा. प्रज्ञा भीमटे उपस्थित होत्या. त्यांनी झालेल्या मांडणीवर सकारात्मक प्रतिक्रिया देत, कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, निषेध आणि निवारण) कायदा २०१३ ह्या दोन्ही महत्वाच्या कायद्यासंदर्भात महिलांना संक्षिप्त माहिती दिली. तसेच त्यांनी तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या संरक्षण अधिकाऱ्यांची महिलांना ओळख करून दिली, आणि सांगितले की महिलांना मदतीची गरज पडल्यास त्यांच्या तक्रारी त्या प्रथमतः तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या संरक्षण अधिकाऱ्यांकडे करू शकतात.

### सत्र तिसरे : घरगुती व कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा: सध्य परिस्थिती



या सत्रामध्ये श्रीमती. उज्वला देवकर (पोलीस निरीक्षक, भरोसा सेल ,अकोला), श्रीमती. वर्षा खोब्रागडे (जिल्हा समन्वयक मावीम, अकोला), श्री. प्रदीप टाक (संरक्षण अधिकारी), श्रीमती. प्रतिभा काटे (अध्यक्ष, एन.जी.ओ. फेडरेशन), आणि महत्वाचे म्हणजे शेतकरी महिला प्रतिनिधी श्रीमती. शीला गीरे आणि श्रीमती. संगीता बोळे उपस्थित होत्या. तसेच या सत्राचे सत्र नियंत्रण टाटा सामाजिक विज्ञानसंस्था च्या प्रतिनिधी श्रीमती. प्रतिभा गजभिये यांनी केले.



श्रीमती. शीला गीरे यांनी ठाम मत दिले की महिलेला सन्मानाणे बोलणे-वागवले पाहिजे, बाकी तर ती काम करण्यास मागे पडत नाही. संगीता बोळे ह्यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनातील कष्ट आणि अनुभवाची मांडणी जरी मिश्किल व सहज स्वरुपात केली असली तरी त्यांचे प्रत्येक अनुभव हादरवणारे होते. त्या त्यांच्या रोजच्या संघर्षाची मांडणी करताना त्यासोबत करीत असलेल्या आर्थिक, भावनिक आणि मानसिक हिंसा आणि तडजोडीचीही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे स्पष्टता देत होत्या. शेतकरी महिला प्रतिनिधींनी एका बाजूस त्या स्वतःच्या आणि सोबतच सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या महिला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचा उलगडा त्यांनी केला.

पुढे, श्री. प्रदीप टाक, आणि श्रीमती. उज्वला देवकर यांनी महिलांना उद्देशून पोलीस यंत्रणा, भरोसा सेल आणि न्याय व्यवस्था कशी सोबत काम करीत असते आणि त्यामाध्यमातून महिलांना ते मदत करू शकतात याबद्दल चर्चा केली. तसेच या सत्रामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा समन्वयक, श्रीमती. वर्षा खोब्रागडे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महिलांच्या अनुभवांचा आधार घेत पितृसत्ता महिला शेतकऱ्यांवरील हिंसेला कशी कारणीभूत आहे, यावर विवेचन केले. तसेच त्यांनी स्पष्ट मत दिले की महिलांसोबत त्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करीत असताना पुरुषांसोबत सुद्धा त्यांची संवेदनशीलता वाढावी या दृष्टीने काम करण्याची गरज आहे. याच सत्रामध्ये पुढे प्रतिभा काटे यांनी विविध उदाहरणे देत महिलांना मार्गदर्शन केले आणि सांगितले की हिंसेचा विरोध करताना किंवा स्वतःचा बचाव करताना योग्य त्या युक्त्या उपयोगात आणायच्या आणि नातेसंबंधामध्ये एकदुसऱ्याच्या सहकार्याने जीवनामध्ये सकारात्मक बदल आणायचा. प्रतिभा गजभीये यांनी सत्रातील वक्त्यांचे आभार मानले.

### सत्र चौथे : पुढील दिशा




या सत्रामध्ये ॲड. मनीषा भोरे (केंद्र प्रशासक, सखी वन स्टाप सेंटर, अकोला), महिला प्रतिनिधी उषा घाटे आणि सत्राचे सत्र नियंत्रक म्हणून सोपेकॉम च्या सीमा कुलकर्णी उपस्थित होत्या. उषा घाटे आणि त्यांची मुलगी गायत्री, यांनी त्यांच्या अनुभवांची मांडणी केली. कुटुंब म्हणून संघर्षाचा सामना करीत त्यातून मार्ग काढून खंबीरपणे जगणे आणि अधिकारासाठी झटत राहणे हे लक्षात घेता येणारी बाब होती. तसेच, ॲड. मनीषा भोरे यांनी सखी सेंटर चा उद्देश आणि ती यंत्रणा हिंसाग्रस्त महिला व कुटुंबांना कशाप्रकारे मदत करते या बद्दल सांगितले. त्यासोबतच त्यांनी महिलांना उद्देशून बोलताना सांगितले की स्थानिक पातळीवरील यंत्रणेपर्यंत पोहोचून महिलांनी त्यांचे प्रश्न सुरवातीला सोडवण्याचा पूर्ण प्रयत्न करावा.




पुढे सीमा कुलकर्णी यांनी सत्राचे समारोपीय भाष्य केले, त्यात त्यांनी महिलांसमोर काही प्रश्न उपस्थित केले. त्या म्हणाल्या की संस्कृती सांभाळण्याची जबाबदारी महिलांचीच का? मुले आणि मुलींना समान वागणूक देऊन दोघांना मूल्य दिली पाहिजेत. तसेच त्यांच्या सामाजीकरणाची जबाबदारी ही एकट्या महिलेली नाही तर ती दोघांची आई-वडील ह्या दोघांची आहे. म्हणून महिलेनी एकट्यावर दडपण न घेता व हिंसेला बळी न पडता सुरक्षित कसे राहता येईल या दृष्टीने जगायला हवे, असे त्यांनी महिलांना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपेकॉमच्या ऋचा वसुमती सतीष ने केले आणि शेवटी वनिता तुमसरे ने आभार मानले.